**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. १२९–२०१०/ दिनांक :

श्री. केतन भिमराया बिराजदार,
मु.पो. निगडी बुद्रुक, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली
३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. केतन भिमराया बिराजदार, मु.पो. निगडी बुद्रुक, ता. जत, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंप विद्युत पुरवठा मिळण्यासाठी वि.प.कडे दि. ३१.३.२०१० रोजी अर्ज केला व त्यासाठी आवश्यक ती फी रु. ५०/– पावती क्र.५३४२२०८ ने त्याचदिवशी भरली. वितरण मेन्सचा विस्तार असल्याने हे चलन त्यांना दि. ३०.४.२०१० पर्यंत मिळणे आवश्यक होते. तसे झाले नाही त्यामुळे तक्रारदार यांनी विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मंचाकडे दि. १९.६.२०१० रोजी अ नमुनामध्ये अपील दाखल केले. त्यापूर्वी तक्रारदार यांनी तक्रार क्र. १३३ दि. २६.५.२०१० नुसार अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दिली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ६३१३ दि. २९.५.२०१० रोजी पारित केले. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात श्री. केतन भिमराया बिराजदार यांनी शेतीपंप वीज पुरवठा मागणी अर्ज दि. ३१.३.२०१० रोजी प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ७.७.२०१० रोजी चलन देण्यात आले.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख उप विभाग श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांच्या म्हणण्यानुसार दि. ३०.४.२०१० पासून पुढे होणाऱ्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे भरपाई तक्रारदार यांस वि.प.कडून मिळावी कारण चलन दि. ७.७.२०१० ला मिळाले आहे. वि.प.ने विलंबाबाबत कुठलाही लेखी/ तोंडी खुलासा केला नाही.

कृती मानके विनियमातील तरतुदीनसार वितरण मेन्सचा विस्तार असलेने अर्जापासून ३० दिवसांत म्हणजे दि. ३०.४.२०१० पर्यंत चलन देणेची वि.प.ची जबाबदारी होती. प्रस्तुत प्रकरणात दि. ७.७.२०१० रोजी चन देण्यात आले आहे. चलन मिळण्यास दि. ३०.४.२०१० ते ७.७.२०१० इतका ९ आठवड्यांचा विलंब झाला असल्याने तक्रारदार यांस प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे ९ आठवड्यांचे रु. ९००/– देणेस वि.प. बांधील आहे.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस दि. ३०.४.२०१० ते ७.७.२०१० या ९ आठवड्यांच्या विलंबाच्या कालावधीच्या प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ९००/– भरपाई द्यावी.
३) सदर रकमेचे बिलातून समायोजन करण्यात यावे.
४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष